# राशिभविष्य - जुलै, २०१६.

दादा दामले(dadadamle@gmail.com)

==================================================

**(१) मेष** - या राशीच्या मंडळीचा स्वभाव सध्या अस्थिर, चंचल, लहरी असा झाला असावा असे वाटते. तसे असेल तर कोणाचाही धाक वा दडपण सहन होत नसावे. ज्यांची या राशीची लहान मुले आहेत त्यांनी मुलांकडे विशेष लक्ष द्यावे. कारण या काळात त्यांचा हूडपणा, व्रात्यपणा वाढला असण्याची शक्यता जाणवते. नोकरी-व्यवसाय काहीही असो, या राशीच्या मंडळीना महिन्याचा पूर्वार्धच अनुकुल व लाभदायक होईल. त्यामुळे जे काय साध्य करावयाचे आहे ते त्यांनी महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा प्रयत्न करावा. पण चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यात कार्यमग्न असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकूल, प्रगतिकारक व यशदायक होईल. दलाली, कमिशनवर व्यवसाय असणारानाही संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगतीस काळ अनुकुल होईल. मात्र त्यांना आपले सर्वांगीण आरोग्य उत्तम राखता आले पाहिजे. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुखात व गृहसौख्यात विविध कारणानी बाधा येणे संभवते. मुलांपैकी कोणाचे अनारोग्य, कोणाचे शिक्षणाकडे दुर्लक्ष , कोणाची अन्य काही समस्या अशापैकी कारणानी संततिसुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या मंगळ व वक्री शनीमुळे सतत अपेक्षाभंग होणे संभवते. तसेच काही मंडळीना कुसंगतीची बाधा होणे संभवते. जपा. महिन्याच्या पूर्वार्धात वैवाहिक सुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. श्रद्धेने श्रीगणेश उपासना करा.

**(२) वृषभ** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ कौटुंबिक सुखाच्या दृष्टीने व गृहसौख्याच्या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. अनिष्ट घटना घडणे, आप्तेष्टात भांडणे होणे, हाती घेतलेल्या कामात अपयश येणे अशा प्रकारच्या घटना घडण्याची शक्यता दिसते. तसेच वाढत्या खर्चाची चिंता, आर्थिक नुकसान, फसवणूक अशा प्रकारच्या घटना घडणे संभवते. जपा. तशातच काहीना नेत्रविकार त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. शिवाय नातेवाईक मंडळीकडून त्रास होणे संभवते. अशा परिस्थितीत बुध-गुरु-शुक्र या शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे काही

मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. काही मंडळीचे अपेक्षेप्रमाणे स्थावर खरेदी-विक्रीचे व्यवहार होतील. या राशीच्या मंडळीना नोकरी-व्यवसायात महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. द्रव पदार्थाचे व्यापारी, मानसिक रोग तज्ज्ञ यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय संशोधन क्षेत्र असणाराना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. काही मंडळीना उष्णताविकाराचा तर काहीना वातविकाराचा आजार त्रस्त करील जपा. महिन्याच्या उत्तरार्धात वैवाहिक जीवनात जीवनसाथीचे अनारोग्य, दोघातील वाद, गैरसमज अशा कारणांनी वैवाहिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. काहीना कुसंगतीचे दुष्परिणाम सहन करावे लागण्याची शक्यता आहे. जपा. या राशीच्या युवकांनी हातचे सोडून नवीन काही करण्याचा विचारही करू नये. आहे तो नोकरी-व्यवसायच मनापासून करावा. या राशीच्या व्यय स्थानी असलेल्या हर्षलमुळे असह्य त्रास होणे संभवते. सहनशील व्हा, मनावर ताबा ठेवून आचरण करा. त्यामुळेच होणारा मनस्ताप सुसह्य होईल. शिवोपासना अनुकुलहोईल.

**(३) मिथुन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीना सांगावेसे वाटते की “पोटात एक, ओठात एक“ अशा प्रकारचे धूर्ततेचे आचरण होणे संभवते. तशा प्रकारचे आचरण करू नका. मानसिक अस्वस्थता लपविण्यासाठी असे आचरण होणे संभवते. पण अध्यात्मात रस असेल तर आध्यात्मिक उपासना करा. त्यासाठी काळ अनुकुल आहे. आध्यात्मिक प्रगती होईल, व सात्विक सुखशांती लाभेल. नोकरी-व्यवसायाच्या दृष्टीने संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असण्याचीच शक्यता दिसते. मित्रांशी भांडणे होतील व त्यामुळे मैत्रीत वितुष्ट येईल. जपा. नियोजित कार्यात अडथळे येणे संभवते. आर्थिक फसवणूक झाल्यास आर्थिक चिंता त्रस्त करतील. सर्व बाजूनी पीछेहाट होणे संभवते. विविध कारणानी अपेक्षितसंततिसुख मिळणे शक्य दिसत नाही. पण सर्व शुभ ग्रहांच्या अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील, व दिलासा मिळेल. गुरू-हर्षल शुभ योगामुळे काहीना धनलाभ होणे संभवते. राहूमुळे भावंड सुखात बाधा येणे शक्य आहे. जपा. मनस्तापामुळे शारीरिक उष्णता भडकून अनारोग्य होणे संभवते. रक्तदाब, हृदयविकार असणारांनी मन व विचारशक्तीवर ताबा ठेवावा. या राशीच्या साहित्यिकांना नवीन साहित्य निर्मितीसाठी काळ अनुकुल होईल. तसेच वैद्यकीय व्यवसाय, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यासाय असणारांना महिन्याचा उत्तरार्ध अधिक अनुकुल व लाभदायक होईल. विविध कारणानी या राशीच्या विद्यार्थ्यांच्या

शैक्षणिक प्रगतीत बाधा येणे संभवते. काही मंडळीना सूचक स्वप्ने पडतील तर काहीना परदेश -गमनाची संधी मिळेल. श्रद्धेने श्रीगणेश उपासना अनुकुल होईल.

(४) **कर्क** - या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ घरीदारी सर्वच ठिकाणी प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना नोकरीत मनस्ताप, पीछेहाट, अडचणी, अडथळे सहन करावेलागण्याची शक्यता दिसते. त्यातच भर म्हणून आर्थिक समस्याही त्रस्त करतील. जपा. कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे, असमाधानकारक घटना यांमुळे मनस्तापच सहन करावा लागेलसे दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात विविध कारणांनी संततिसमस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या काही मंडळीना राहत्या जागेची समस्या त्रस्त करील; तर काहीना स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करील. या सर्वाचा शारीरिक आरोग्यावर परिणाम होऊन उष्णता विकार बळावतील काही मंडळीना त्वचारोग, काहीना रक्तविकार किंवा मुखदन्तरोग सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या नेपच्यूनमुळे विषभय, जलभय आहे. जपा. या महिन्याचा उत्तरार्ध वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते, यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, चिकित्सक बौद्धिक व्यवसाय व शास्त्रीय संशोधन व्यवसाय असणारांना अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. अशा प्रतिकुल काळातही शुभ ग्रहांच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व दिलासामिळेल. आपली राशी चंद्राची राशी असल्याने व चंद्र मनाचा कारक असल्याने मानसिक स्वास्थ्य व शांती लाभण्यासाठी श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. दररोज नियमितपणे " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे पठण करा.

(५) **सिंह** - नोकरी-व्यवसाय, कौटुंबिक सुख, गृहसौख्य अशासर्व दृष्टीनी या राशीच्या मंडळीना या महिन्याचा केवळ पूर्वार्धचअनुकुल , यशदायक व सुखसमाधान देणारा असा असणार आहे. त्यामुळे त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते सर्व महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. कोणताही नोकरी-व्यवसाय असो, या राशीच्यासर्वांना महिन्याचा पूर्वार्धच लाभदायक व यशदायक होणार आहे. केवळ चिकित्सक उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांनाच संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. या राशीच्या काही मंडळीना दूरच्या प्रवासा चे तर काहींना परदेशगमनाचे योग येतील.

राहूमुळे अल्प मनस्ताप देणाऱ्या घटना घडतील व वातविकाराचा आजार त्रास होणे संभवते. तसेच काहीना शारीरिक इजा होणेही शक्य दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात परिस्थिती सर्वच बाबतीत प्रतिकुल होईल. कौटुंबिक जीवनात गैरसमज, असमाधानकारक घटना, भांडणतंटे, राहत्या जागेसंबंधीची समस्या स्थावरसंबंधी समस्या त्रस्त करतील. जीवनसाथीचे अनारोग्य, कोर्ट प्रकरणे, नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांशी न पटणे, भागीदारी व्यापार-व्यवसायातयेणारी बाधा अशापैकी कारणांनी घरीदारी सतत मनस्तापच होणे संभवते. जपा. अशा परिस्थितीत आपल्या अहंकारी स्वभावावर नियंत्रण ठेवून व जिभेवर ताबा ठेवून नम्रतेचे आचरण करू शकलात तर खूपच सुखाचे होईल. नैराश्य येणारच नाही. श्रद्धेने कुलदैवताची उपासना करा.

**(६) कन्या-** या राशीच्या मंडळीना या महिन्याचा काळ खूपच अनुकुल असल्याचा अनुभव येईल. पण या राशीच्या काही मंडळीना काल्पनिक चिंता सतावतील; तर काही मंडळीना उगीचच आपल्याला काही आजार झाल्याची भावना त्रस्त करील. काहीना फसवणूक झाल्याची खंत वाटेल. त्यामुळे अनुकुल काळाचा लाभ घेणे त्यांना जमेल की नाही, हे सांगता येत नाही. या राशीच्या काही मंडळीना नवे आवडीचे कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. काहींना नवी नोकरी मिळू शकेल. धैर्य, हिम्मत, महत्त्वाकांक्षा वाढेल. पण या राशीच्या अष्टम स्थानी असलेल्या हर्षलमुळे अपघात भय आहे. त्यामुळे सतत सावधानतेने आचरण होणे आवश्यक आहे. या राशीच्या नोकरदार मंडळीना नोकरीत विविध प्रकारचे लाभ होतील. शासकीय, निम-शासकीय नोकरदार मंडळीना पगारवाढ, बढती, मानाचे स्थान असे काही मिळू शकेल. कलात्मक कार्यक्षेत्र असणारांना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल व लाभदायक होईल. पण सामान्य नोकरी असणारांना महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. अध्यात्म, सामाजिक कार्य यात रस असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल होईल. उपासनेद्वारे सात्विक सुखसमाधान लाभेल. पण या राशीच्या व्ययस्थानी असलेल्या राहूमुळे वैवाहिक जीवनातील सुखातबाधा निर्माण होणे संभवते. पण याच राहूमुळे काहीना अर्थलाभ होईल; तर काहीना परदेशगमनाची संधीही मिळू शकेल. वक्री शनि ग्रहामुळे भावंडविषयक एखादी चिंता अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा, दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा “चे पठण करा.

(७) तुळा - या राशीच्या मंडळीची मानसिक स्थिती अत्यंत भावनाशील झाली असण्याची शक्यता जाणवते. त्यामुळे वक्री शनि-मंग़ळ ग्रहांच्या प्र तिकुलतेचा मनावर खोल परिणाम होणे संभवते. म्हणून अध्यात्मिक प्रगतीस काळ अनुकुल असल्याने या राशीच्या मंडळीनी आध्यात्मिक उपासना करावी, हे उत्तम त्यामुळे आर्थिक जबाबदाऱ्या पूर्ण करण्यासाठी करावी लागणारी अकारण धडपड होणार नाही, मन शांत राहील व विचारांची खळबळ कमी होईल. नपेक्षा शारीरिक उष्णता भडकून उष्णता विकार बळावतील. घसा, दाढा, मान दुखणे, डोळयात खुपऱ्या वाढणे अशापैकी आजार होणे संभवते. वक्री शनिमुळे कुटुंबात अनिष्ट घटना घडण्याची शक्यता दिसते. जपा. या राशीच्या सर्व प्रकारच्या नोकदार मंडळीना महिन्याचा उत्तरार्धच अनुकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात नोकरीत मानसिक ताण, वरिष्ठांची वक्र दृष्टी, मानहानी सहन करावी लागण्याची शक्यता दिसते. जपा. पण महिनयाचा उत्तरार्ध कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना फारसा अनुकुल होणार नाही. इतरांना अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या पूर्वार्धात शुक्र ग्रहाच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील. या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडथळे, अडचणी निर्माण होणे संभवते. जीवनसाथीचे लहरी, विक्षिप्त आचरण, पतीपत्नीत विविध कारणानी होणारे वाद, भांडणे अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात्बाधा येणे संभवते, जपा. भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी संशय, गैरसमज अशापैकी कारणानी भागीदारीत बाधा येणार नाही याकडे लक्ष द्यावे. मन:शांतीसाठी श्रीभगवान शंकराची उपासना करा.

(८) वृश्चिक - शनि ग्रहाच्या साडेसातीचा काळ असल्याने या राशीच्या मंडळीनी आपल्या उतावळ्या, संतापी स्वभावाला ताब्यात ठेवले, अस्वस्थ चंचल मनाला लगाम घातलात, वेड्यावाकड्या विचारांना थारा दिला नाहीत व सहनशील बनून आणि नम्रतेचे आचरण करून प्रतिकुल काळाशी मुकाबला केला तर खूपच सुखाचे होईल व मधून मधून शुभ ग्रहांच्या अनुकुलतेने घडणाऱ्या मनोनुकुल घटनांचा आनंद उपभोगता येईल. रवि-मंगळ-शनि हे महत्त्वाचे ग्रह पूर्णपणे प्रतिकुल असल्यामुळे घरीदारी सर्व ठिकाणी मनस्ताप देणाऱ्या घटनांना सामोरे जावे लागेल. महिन्याच्या पूर्वार्धात स्वाभाविक दोषांमुळे शरीरपीडा, दगदग, श्रम करावे लागण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात आर्थिक चिंता, गैरसमजुती, भांडणे, आर्थिक नुकसान, मानहानी अशा प्रकारचा त्रास सहन करावा लागणयाची शक्यता दिसते. जपा. काही

जुनी, दबलेली प्रकरणे असतील तर तीही पुन्हा उकरली जाऊन त्यांचा असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. जपा. या राशीच्या नोकरदार मंडळीना संपूर्ण महिन्याचा काळ प्रतिकुल असल्याचा अनुभव येईल. तसेच महिन्याच्या पूर्वार्धात जीवनसाथीच्या व मुलापैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करण्याची शक्यता जाणवते. विविध कारणांनी गृहसौख्यातही बाधा येणे शक्य दिसते. पण चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र आणि शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना संपूर्ण महिन्याचा काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. श्रद्धेने श्रीगणेशाची व श्रीह् नुमानाची उपासना करा. दररोज नियमितपणे हनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(९) धनु -** शनी ग्रहाची साडेसाती चालू आहे ही गोष्ट ध्यानात घेऊन या राशीच्या मंडळीनी आपला स्वभाव, मनोवृत्ती आणि विचारशक्ती काबूत ठेवून व सहनशील होऊनच सतत नम्रतेचे आचरण करावे, असे आवर्जून सांगावेसे वाटते. कारण या महिन्याच्या काळात रवि, वक्री मंगळ व शनि हे प्रमुख ग्रह पूर्णपणे प्रतिकुल आहेत. त्यामुळे सतत मनाविरुद्ध घटना घडणे, घरीदारी वाद, भांडणे होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे, काही जुनी दबलेली प्रकरणे असतील तर त्यांचा पुन्हा त्रास होणे, स्त्री वर्गाकडून त्रास होणे, मानहानी होणेअशापैकी घटना घडण्याची दात शक्यता वाटते. जपा. आध्यात्मिक उपासनेत लक्ष घातलेत व मौन पाळून प्रतिकुल काळ व्यतीत केलात तर खूपच सुखाचे होईल. राहूमुळे संततिसुखात व कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. तसेच जीवनसाथीशी वाद, भांडणे होणे संभवते. शिवाय स्वत:चे व जीवनसाथीचे अनारोग्यही वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता आहे. जपा. तुलनात्मक दृष्ट्या महिन्याच्या पूर्वार्धापेक्षा उत्तरार्ध बारा जाईल. परिश्रम केल्याचे चीज होईल. काहीना मौल्यवानवस्तूंचा लाभ होईल. काही मंडळीना जलप्रवासाचे तर काहीना परदेशगमनाचे योग संभवतात. गुरु-हर्षल शुभ योगामुळे चिकित्सक उच्च बौद्धिक कार्यक्षेत्र असणाराना व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना काळ अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. इतर सर्व प्रकारच्या नोकरदार मंडळीना प्रतिकुलकाळाशीच मुकाबला करावा लागेल. महिन्याच्या उत्तरार्धात बुध-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेने काही मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा "चे नियमितपणे पठण करा.

**(१०) मकर -** या राशीच्या नोकरदार मंडळीना महिन्याच्या पूर्वार्धच अनुकुल,

यशदायक व लाभदायक होईल. म्हणून त्यांनी जे काय साध्य करावयाचे ते महिन्याच्या पूर्वार्धातच साधून घेण्याचा आटोकाट प्रयत्न करावा. महिन्याच्या उत्तरार्धात घरीदारी मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता असल्याने शारीरिक-मानसिक अनारोग्याचा त्रास होणे संभवते. काही मंडळीना पोटविकाराचा तर काहीना मूत्राशयविकाराचा त्रास होणे संभवते. शिवाय आर्थिक समस्याही त्रस्त करतील. जपा. या राशीच्या चतुर्थ स्थानी असलेल्या हर्षलमुळे घरी कोणाशीही पटणार नाही, समजावून सांगितले तरी ते आवडणार नाही. काही केले किंवा झाले तरी सुखसमाधान लाभणार नाहे. आहे त्या परिस्थितीत बरे वाटणार नाही. सतत तक्रारी करत राहाल. त्यामुळे वास्तुसुखही लाभणार नाही. जपा. दाम्पत्यजीवनात जीवनसाथीचे अनारोग्य किंवा जीवनसाथीशी वाद, भांडणे, गैरसमज अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखातही बाधा येणे संभवते जपा. महिन्याच्या पूर्वार्धात मित्राशी वितुष्ट येणे संभवते. शिवाय कष्ट परिश्रम करूनच काही प्रमाणात अर्थप्राप्ती होईल. काहीना कुसंगतीचा परिणाम भोगावा लागणेही संभवते. जपा. पण या राशीच्या काही भाग्यवान मंडळीना मौलिक वस्तूंचा लाभ होणेही शक्य दिसते. यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय, वैद्यकीय व्यवसाय, औषध विक्रेते अशांनाही महिन्याचा पूर्वार्धच लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात व्यवसायात खळबळजनक घटना घडणे, नोकरीत कामाचा ताण असह्य होणे, वरिष्ठांशी न पटणे अशापैकी कारणानी मनस्ताप होणे संभवते. जपा. ज्या मंडळीच्या जन्म कुंडलीत अचानक धनलाभयोग असेल अशापैकी काहीना असा अचानक धनलाभ तर काहीना वारसा हक्काने धनलाभ होणे संभवते.

**(११) कुंभ** - या राशीच्या मंडळीचा वर्तमान स्वभाव अतिशय हळवा, व मनस्थिती अतिशय संवेदनशील झाले असावे, असे जाणवते. त्यामुळे मनाविरुद्ध थोडेही काही घडले तर लगेच गहरे नैराश्य येत असावे, असे वाटते. कारण तुम्ही मनात योजता एक, पण घडते उलटच. नेपच्यून-केतू युतीमुळे असे घडण्याची शक्यता वाटते. या महिन्याचा पूर्वार्ध या राशीच्या मंडळीना नोकरीव्यवसायाच्या दृष्टीने प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. नोकरीत वरिष्ठांचा त्रास तर घरी संततिसमस्या त्रस्त करील. तसेच घरीदारी वाद्र भांडणे यामुळे असह्य मनस्ताप होणे स्वाभाविक आहे. त्यामुळे मन व विचारशक्तीवर ताबा ठेवून व सहनशील बनून आचरण करणेच सुखाचे होईल. अशा परिस्थितीत केवळ कोळसा, लोखंड व्यापारी, वैद्यकीय व्यवसाय आणि औषध विक्रेते यांनाच केवळ महिन्याचा पूर्वार्ध अनुकुल व लाभदायक होईल. पण महिन्याचा

उत्तरार्ध सर्वच प्रकारच्या नोकरदार मंडळीना, चिकित्सक बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र व कलाक्षेत्र असणारांना अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. पण जीवनसाथीच्या अनारोग्यामुळे, दोघांतील वाद, भांडणे अशापैकी कारणानी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. जपा. पण या राशीच्या विवाहेच्छूचे विवाह ठरतील. नवे मित्र मिळतील, प्रेमसंबंध जुळून येतील. सतत सावधानतेने आचरण करा. वाहन भय किंवा कोणत्याही प्रकारचे अपघात भय आहे. जपा. अशा परिस्थितीत मन:शांती मिळावी यासाठी शिवोपासना करा. तसेच श्रीहनुमानचालिसा स्तोत्राचे पठण करा.

**(१२) मीन -** या महिन्याच्या काळात या राशीच्या मंडळीचा स्वभाव अतिशय चंचल, लहरी असा घडण्याची शक्यता दिसते. त्यामुळे अविचाराने खर्च होणे संभवते. तसेच विचित्र आचरण होणेही शक्य आहे. या राशीच्या मंडळीनी जिभेला लगाम घालावा, असे मुदाम सांगावेसे वाटते. कारण आपल्या फटकळ बोलण्यामुळे अकारण प्रिय जन दुखावले जातील. जपा. नोकरी कोणत्याही प्रकारची असो, या राशीच्या नोकरदार मंडळीना काळ प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. तसेच अनारोग्य, कौटुंबिक वाद, भांडणे यांमुळे कौटुंबिक सुखातही बाधा येणे संभवते. जपा. पण बुध-शुक्राच्या काही प्रमाणातील अनुकुलतेमुळे मधून मधून मनोनुकुल घटना घडतील व परिस्थिती आटोक्यात राहील. मित्राचा सहवास सुखदायक होईल. शेती व्यवसाय असणाऱ्या या राशीच्या मंडळीना शेतीवाडीपासून लाभ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात कौटुंबिक सुख लाभेल. पण संततिसमस्या त्रस्त करण्याची शक्यता आहे. जपा. तसेच नोकरीत वरीष्ठांचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. त्यामुळेच शारीरिक अनारोग्य होणे संभवते. अशा परिस्थितीत सतत सावधानतेने आचरण करा, कारण अपघात भय आहे. जपा. बौद्धिक, शैक्षणिक नोकरी-व्यवसाय असणारांना महिन्याचा संपूर्ण काळ अनुकुल, प्रगतिकारक व लाभदायक होईल. तसेच परधर्मीयांशी व्यावसायिक संबंध असणारांना अशा संबंधामुळे आर्थिक लाभ होणे संभवते. शक्यतो प्रवास करू नका. कारण प्रवासात आशय मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धेने श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना करा. श्रद्धेने दररोज नियमितपणे “बावन्न श्लोकी गुरुचरित्र “ चे पठण करा.

=====ooooo0ooooo=====